# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर, ४४० ००१

**ईमेलद्वारे**

क्र. कक्ष-१०(१)/आस्था/एक/प्र.क्र.६५(१८-१९)/ 1258
नागपूर ४४०००१, दिनांक 1/12/2023

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा.)सर्व
वनसंरक्षक (प्रा.)सर्व

**विषय :** वन परिक्षेत्र अधिका-याचे निलंबनाबाबत

प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत क्षेत्रीय स्तरावरील मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक हे विभाग प्रमुख म्हणून व उपवनसंरक्षक हे प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणून वन परिक्षेत्र अधिका-यांविरुध्द शिस्तभंग विषयक प्राधिकारी म्हणून कार्यवाही करीत आहेत. तसेच शिस्तभंग विषयक प्राधिकारी म्हणून त्यांचेविरुध्द निलंबनाची कार्यवाही सुध्दा करीत आहेत. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे तरतूदी निदर्शनास आणून देण्यात येत असून सूचनांही देण्यात येत आहे.

(१) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ४ (१) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

*"४(१) :-नियुक्ती प्राधिकरण किंवा नियुक्ती प्राधिकरण ज्या प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली आहे, असे कोणतेही प्राधिकरण, किंवा* ***शिस्तभंगविषयक प्राधिकरण,*** *किंवा राज्यपालांनी यासबंधात सर्वसाधारण व विशेष आदेशान्वये अधिकार प्रदान केलेले अन्य कोणतेही प्राधिकरण, शासकीय कर्मचा-याला*

*(अ) ज्या बाबतीत त्याच्याविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याचे योजिले असेल किंवा अशी कार्यवाही प्रलंबित असेल, किंवा,*

*(ब) ज्या बाबतीत, तो कर्मचारी राज्याच्या सुरक्षितेच्या दृष्टीने बाधक ठरणा-या कार्यामध्ये गुंतलेला आहे असे पूर्वोक्त प्राधिकरणाचे मत असेल, किंवा,*

*(क) ज्या बाबतीत त्याच्याविरुध्द कोणत्याही फौजदारी गुन्ह्याच्या संबंधात खटल्याचे अन्वेषण, चौकशी किंवा न्यायचौकशी सुरु असेल, अशा बाबतीत निलंबनाधीन ठेवू शकेल.*

*परंतु नियुक्ती प्राधिका-यापेक्षा खालच्या दर्जाच्या प्राधिका-याने निलंबनाचा आदेश काढला असेल त्याबाबतीत अशा प्राधिकरणाने ज्या परिस्थितीत प्रस्तुत आदेश काढला असेल ती परिस्थिती ते प्राधिकरण तात्काळ नियुक्ती प्राधिका-याला कळवील"*

वन परिक्षेत्र अधिका-याचे नियुक्ती प्राधिकारी शासन आहे. त्यामुळे वन परिक्षेत्र अधिका-याचे निलंबन आदेश जर मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक / उपवनसंरक्षक यांचे स्तरावर निर्गमित केले असले तर त्यांनी ज्या परिस्थितीत निलंबनाचे आदेश काढले ती परिस्थिती तात्काळ नियुक्ती

प्राधिका-याला म्हणजेच शासनाला कळविणे बंधनकारक आहे. त्यानुसार कार्यवाही होत नसल्याने काही प्रकरणात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने निलंबनाचे आदेश रद्द केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे वरील नियमातील तरतुदींचे तंतोतंत पालन करावे.

(२) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम,१९७९ चे नियम ४(२) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

*"४(२) शासकीय कर्मचा-याला –*

*(अ) फौजदारी आरोपावरुन किंवा अन्य कारणावरुन अटक करुन ४८ तासांहून अधिक काळ पोलीस किंवा न्यायालयीन अभिरक्षेमध्ये ठेवले असेल तर, त्याला अटकेत ठेवल्याच्या दिनांकापासून,*

*(ब) तो सिध्दपराध ठरुन त्याला ४८ तासांहून अधिक मुदतीच्या कारावासाची शिक्षा झाली असेल आणि अशा अपराधसिध्दीनंतर त्याला लगेच बडतर्फ केले नसेल, किंवा सेवेतून काढून टाकले नसेल, किंवा सक्तीने सेवानिवृत्त केले नसल्यास त्याच्या अपराधसिध्दीच्या दिनांकापासून* ***नियुक्ती प्राधिकरणाच्याआदेशाद्वारे*** *निलंबनाधीन ठेवले असल्याचे मानले जाईल."*

वरील नियम ४(२) मध्ये नमुद मानीव निलंबनाचे प्रकरणी मानीव निलंबनाचे आदेश नियुक्ती प्राधिकारी म्हणजेच वन परिक्षेत्र अधिका-यांचे बाबतीत शासन स्तरावरुन होणे आवश्यक आहे. सदर तरतूदीचे तंतोतंत पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

(३) निलंबनाबाबत विभागीय चौकशी नियमपुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील २.१ मध्ये शासकीय कर्मचा-याला केव्हा निलंबित करता येईल, ती परिस्थिती नमुद केली आहे. ती खालीलप्रमाणे नमुद आहे.

*"शासकीय कर्मचा-याला निलंबित करण्याचा निर्णय घेताना लोकहित हा मार्गदर्शक घटक असावा. शिस्तभंग विषयक प्राधिका-यांनी शासकीय कर्मचा-यास पुरेशा समर्थनाशिवाय बेफिकरीने निलंबित करु नये. त्यांनी आपल्या स्वेच्छाधिकाराचा अत्यंत काळजीपूर्वक वापर करावा.*

*निलंबन समर्थनीय ठरु शकेल अशा परिस्थितीतच निलंबनाचा आदेश देण्यात यावा. याबाबत सर्वसाधारण तत्व असे असावे की, सामान्यपणे शासकीय कर्मचा-याविरुध्द केलेली अभिकथने गंभीर स्वरुपाची असल्याशिवाय, आणि उपलब्ध पुराव्याच्या आधारे प्रथमदर्शनी त्यास बडतर्फ करण्यासारखी किंवा सेवेतून काढून टाकण्यासारखी बाब असल्याशिवाय, किंवा तो प्रत्यक्ष सेवेत राहिल्यास त्यामुळे अडचणीची परिस्थिती निर्माण होण्यास किंवा त्या प्रकरणाच्या तपासात अडथळा निर्माण होण्याचा संभव आहे, असे मानण्यास कारण असल्याशिवाय, निलंबनाचा आदेश देण्यात येऊ नये. अन्य प्रकरणात, संबंधित शासकीय कर्मचा-यास साक्षीदारांमध्ये हस्तक्षेप करण्यास किंवा त्याच्याविरुध्द असलेल्या पुराव्यात ढवळाढवळ करण्यास कोणत्याही प्रकारे वाव मिळणार नाही याची खात्री करुन घेण्याच्या दृष्टीने त्याची अन्य ठिकाणी बदली करण्यासंबंधी उपायोजना केल्यास पुरेसे होईल."*

याशिवाय वरील नियमात ज्या कारणासाठी शासकीय कर्मचा-यास निलंबित करणे योग्य होईल याची उदाहरणे मार्गदर्शनासाठी दिली आहे. तरी संबंधित अधिका-याला निलंबित करण्यापूर्वी वरील बाबी विचारात घेण्यात याव्यात.

(४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. निप्रआ-१११११/प्र.क्र.८६/११-अ, दिनांक १४/१०/२०११ मधील परिच्छेद ७(ब) नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम १० खाली चौकशी प्रस्तावित / सुरु असेल तर निलंबनाची कार्यवाही अपेक्षित / समर्थनीय नाही. निलंबन करण्यापूर्वी या बाबीचा विचार करण्यात यावा.

(५) ब-याचदा क्षेत्रीय स्तरावर मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक / उपवनसंरक्षक यांचे स्तरावरुन वन परिक्षेत्र अधिका-यास निलंबित केल्यानंतर याबाबत आक्षेप संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी किंवा संघटनेमार्फत या कार्यालयाकडे घेतला जातो. अशा वेळी झालेल्या कार्यवाहीबाबत हे कार्यालय पूर्णपणे अनभिज्ञ असते. करीता सर्व क्षेत्रीय अधिका-यांना असे सूचीत करण्यात येते की, यापूढे वन परिक्षेत्र अधिका-यास निलंबित करण्यापूर्वी निलंबनाची कारणे माहितीकरीता या कार्यालयास अवगत करावी.

वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(शैलेश टेंभुर्णीकर)
प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन बल प्रमुख)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

**प्रतिलिपी** (**ई-मेलद्वारे**)

१) प्रधान सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व नागपूर / पश्चिम मुंबई
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन शिक्षण व प्रशिक्षण), पुणे
६) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, व्याघ्र प्रकल्प मेळघाट, अमरावती
७) वनसंरक्षक, कार्य आयोजना, पुणे / नागपूर
८) वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, व्याघ्र प्रकल्प सर्व
९) वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण सर्व
१०) वनसंरक्षक (संशोधन), पुणे